ग. दि. माडगूळकरांच्या जीवनावर आधारित कादंबरी

# देवाची पाउले

रवींद्र भट

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**देवाची पाउले** (ग. दि. माडगूळकरांच्या जीवनावर आधारित कादंबरी)
रवींद्र भट

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
रवींद्र भट
एफ-२, सप्तशृंगी अपार्टमेंट, पहिला मजला,
१५११-ब, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३१०/-

श्रीमती विद्याताई माडगूळकर यांस,
सप्तपदीच्या सात पावलांनंतर
कै.ग.दि. माडगूळकरांच्या पावलांवर पाऊल टाकून
गृहिणी, सचिव, सखी आणि जिवलग मैत्रीण
ही आर्य स्त्रीची सारी स्वरूपं
तुमच्या रूपानं अजूनही पंचवटीमध्ये नांदत आहेत.
तुमच्याशिवाय ही 'देवाची पाउले' मी दुसऱ्या कुणाला अर्पण करणार?

– रवींद्र भट

''सूर्ये अधिष्ठिली प्राची । जगा जाणीव दे प्रकाशाची ।।
तैसी श्रोतया ज्ञानाची । दिवाळी करी ।।''

''वाल्मिकीचा शब्द अलौकिक आदिकथा संस्कृत ।
स्वरूप त्याला पहा लाभले सुंदरसे प्राकृत ।।
सहाण कागद, उगाळिले वर झरणीचे चंदन ।
माणदेशच्या मातीमधुनी प्रकटे गजानन ।।''

✦✦✦

## माझे पान

सन १९५५-५६ चा सुमार असेल. माझं वय तेव्हा १४-१५ वर्षांचं! काळजी-काटा, व्यथा, विवंचना असले अवघड शब्द त्या वयात माझ्या शब्दकोशातच नव्हते. एखाद्या एकत्र कुटुंबातील कुटुंबप्रमुखाचे शेंडेफळ जसं लाडावलेलं खोडकर असावं, अगदी तसाच मी! सुप्रतिष्ठित वडिलांचा धाकटा मुलगा...! तसा वडिलांचा मारही खाल्ला खूप. पण त्या माराचे वळ मनावर कधी उठलेच नाहीत. त्यांनी केलेला वात्सल्याचा वर्षावच मनात कायमच्या सात्त्विक आनंदाच्या लहरी रेखून गेला. माझे वडील अतिशय भावनाप्रधान, हळुवार अंतःकरणाचे. कुणाच्याही मदतीला सदा तत्पर. हा घरचा, हा दारचा असा भेदभाव नाही. मावस, चुलत भावालाही सख्ख्या भावापेक्षा जिवापाड जपणारे... अर्थात् वडिलांची ही भावनिक बैठक त्या वयात मला कशी जाणवावी? त्यांचं बाह्य व्यक्तिमत्त्व अतिशय आकर्षक!

भव्य कपाळ. सरळ नाक. खास कोकणस्थी लालसर गुलाबी वर्ण. पूर्ण पाश्चिमात्त्य पोषाख. इंग्रजीवर प्रभुत्व इतकं की त्यांचं भाषण चालू असताना कोर्टातला इंग्रज जज्जदेखील भारावून जायचा! वडिलाच्या या भव्य व्यक्तिमत्त्वापुढं भोवतालची माणसं दबून जायची. मुलं तर घाबरायचीच आमच्या घरी यायला! साहजिकच माझ्या मनातसुद्धा त्यांच्याविषयी सारखी धास्ती असायची. त्यांच्या रागावलेल्या हाकेला ओ देणं मी टाळायचो. त्यांना स्वच्छतेची अतिशय आवड. मी तसा अजूनही गळदट. सकाळी पलंगावर चादर घातली की नाही, हे पाहायला ते दररोज माझ्या खोलीत यायचे. मग खाली जाऊन स्वतः घरातल्या साऱ्यांचा चहा करायचे. आंघोळ आटोपून बरोबर आठ वाजता खुर्चीवर बसून कामाच्या कागदात डोकं खुपसायचे. अगदी लहानपणापासून मी पाहात आलो. त्यांच्या सकाळच्या या कार्यक्रमात क्वचितच कधी बदल झाला असेल...!

मात्र १९५५ साली हे वेळापत्रक बदललं. चहाच्या टेबलावर बसून ते रेडिओ ऐकू लागले. त्यात रंगू लागले. चर्चा करू लागले आणि एक दिवस

टेबलावर कोपर आणि तळहातावर गाल टेकून कुठंतरी शून्यात पाहात मी त्यांना रडताना पाहिलं. त्या समर्थ पुरुषाचं ते मूक रुदन पाहून माझेही डोळे अभावितपणे भरून आले. रेडिओच्या स्पीकरमधून एक करुण गीत स्रवत होतं...

''दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा ।
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ।।''

आणि मग हे दृश्य दहा-वीस वेळा तरी अनुभवलं. गीतारामायणातील गाणं रेडिओमधून बाहेर पडत आहे आणि माझे पुरुषोत्तम वडील शून्यात पाहात मूक रुदन करीत आहेत...!

कै.ग.दि. माडगूळकरांच्या अलौकिक प्रतिभाविलासाचा माझ्या मनाच्या ओल्या मातीवर झालेला हा पहिला दृश्य संस्कार! पुढं ते संपूर्ण वर्ष मी एखाद्या शहाण्या मुलासारखा सकाळी लवकर उठून स्वतःची खोली नीट आवरून वडिलांच्या बरोबर चहाच्या टेबलावर बसून गीतरामायणातील गीतं समरसून ऐकू लागलो. भावनिक आंदोलनाचे अनेक क्षण या काळात मी अनुभवले. भारतीय संस्कृतीची, भारतीय आदर्शाची पहिली ओळख मला झाली. या साऱ्या मानसिक विकासाला साक्ष होते माझे हळुवार अंतःकरणाचे वडील! सुंदर शब्दकळेविषयीची माझी ओढ त्यांनी हेरली. सातत्यानं माझ्यासमोर नवीन पुस्तकं आणून ठेवली. बालवयातच माझा व्यासंग वाढला; त्याला माझ्या वडिलांचं भावनाप्रधान मन आणि त्या मनाच्या तारा छेडणारं तसंच अण्णांचं गीतरामायण कारणीभूत आहे, असं आजही मला विनम्रपणे सांगावंसं वाटतं.

अनुभवाची क्षितिजं दिसामासांनी व्यापक होत होती. मनात मराठी चित्रपटांचं आकर्षण निर्माण होत होतं. त्या काळात मराठी चित्रपटामध्ये साहित्याला अतिशय महत्त्वाचं स्थान होतं. चित्रपटाचं आर्थिक यशापयश मांडताना निर्माते-दिग्दर्शक त्याच्या साहित्यिक अंगाचा अतिशय गंभीरपणे विचार करीत होते. संस्कारक्षम कथा, बंदिस्त पटकथा-भावमधुर काव्य ही बहुसंख्य मराठी चित्रपटांची त्रिसूत्री होती. आणि या त्रिसूत्रीचे मुख्य उद्गाते अर्थातच कै. ग. दि. माडगूळकर. त्यांच्या लेखणीचा परिसस्पर्श लाभलेला प्रत्येक मराठी चित्रपट मी आवर्जून पाहात असे. अगदी दोन दोन वेळा पाहात असे, 'मायाबाजार' चित्रपटाचे संवाद आणि गाणी मी एखाद्या साऊंड ट्रॅकप्रमाणे त्या काळी मित्रांना ऐकवीत असे. पुढे महाविद्यालयात आल्यावर साहित्याची आणखी जवळून ओळख झाली, पण

अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तकापेक्षा माडगूळकरांचं भावगीत मला सदैव जवळचं वाटलं. स्वतःच्या भावनांचं उत्कट संतर्पण माडगूळकरांच्या गीतांइतकं मला इतरत्र कुठं गवसलंच नाही. मनाच्या तरल अवस्थेत माडगूळकरांची कित्येक गाणी आपलीच आहेत, असा संभ्रमही मला वाटू लागला. त्याचबरोबर आता आपल्यालाही असंच काहीतरी लिहिता यायला हवं असंही तीव्रतेनं वाटू लागलं. माझ्या महाविद्यालयीन कवितेकडं पाहिलं तर त्यावर माडगूळकरी शब्दकळेचा किती प्रचंड प्रभाव आहे हे कुणीही सांगू शकेल.

एकलव्याप्रमाणे ही सारी साधना झाली. प्रत्यक्ष माडगूळकरांची कधीही भेट झाली नव्हती. तो योग १९६२ साली आला. माझ्या बंधूंच्या मनात एक मराठी चित्रपट काढण्याची कल्पना बरेच दिवस होती. माझ्यातील कलागुण हेरून त्यांनी मला त्यांच्या योजनेत सामावून घेतलं. पुढे निर्माता म्हणून सारी जबाबदारी मलाच घ्यावी लागली. 'ते माझं घर' या राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या चित्रपटाच्या निर्मितीच्या पूर्वतयारीचा तो काळ होता. आम्ही माडगूळकरांच्याकडे गेलो. चित्रपटाची एकदोन गाणी हौस म्हणून मी लिहावीत आणि उरलेली प्रमुख गाणी अण्णांनी लिहावीत अशी आमची कल्पना होती. कारण चित्रपटाच्या आर्थिक यशासाठी श्रेयनामावलीमध्ये 'ग. दि. माडगूळकर' हे नाव आम्हाला अत्यावश्यक वाटत होते. माडगूळकरांनी या योजनेला आनंदाने होकार दिला. पुढे या चित्रपटाला फिल्म फायनान्स कार्पोरेशनने आर्थिक साहाय्य मंजूर केले. या तऱ्हेचे साहाय्य मिळणारा 'ते माझे घर' हा पहिला मराठी चित्रपट आहे. त्यामुळे चित्रपटाची प्रदर्शनपूर्व जाहिरात खूपच झाली. आम्ही गीतलेखनाचा करार घेऊन माडगूळकरांच्याकडे गेलो. माडगूळकर गंभीर झाले. म्हणाले, ''फिल्म फायनान्स् कार्पोरेशनचं पहिलं मराठी चित्रपट आहे. गीतकार म्हणून माझ्याबरोबर आणखी एका कवीला श्रेय का? सारी गाणी मी लिहितो. नाहीतर तुम्ही लिहा...!''

अण्णा त्यावेळी असे का बोलले याचं मला अजूनही गूढ आहे. साहित्यिक माडगूळकर म्हणून माझ्यासमोर जे चित्र मी उभं केलं होतं, त्याला अण्णांच्या या विधानानं नाही म्हटलं तरी तडा गेला. मग मीही थोडासा जिद्दीला पेटलो. आपण स्वतः निर्माते आहोत. आर्थिक यशापयशाची संपूर्ण जबाबदारी आपण खांद्यावर घेतली आहे. मग सारी गाणी आपणच का लिहू नयेत? संगीत दिग्दर्शक सुधीर फडके यांनी दुजोरा दिला. 'ते माझं घर' ची सारी गाणी मी एका

बैठकीत लिहिली. 'श्रमिकहो घ्या इथे विश्रांती', 'उठी श्रीरामा पहाट झाली' किंवा 'दिव्यादिव्यांची ज्योत सांगते...' यासारखी अजरामर गाणी मी वयाच्या अवघ्या वीस-एकविसाव्या वर्षी लिहिली आणि कौतुकाने सुधीर फडके म्हणाले, ''मराठी चित्रपटाच्या क्षितिजावर नवा माडगूळकर जन्माला आला...!''

त्या अजाण वयात कौतुकाच्या या वर्षावामुळं नाही म्हटलं तरी मला थोडासा गर्व झाला होता. माडगूळकरांच्या गाण्यातील दोष दाखवून देण्याइतका मी गर्विष्ठ झालो होतो. परंतु 'ते माझे घर' चित्रपटाला प्रचंड आर्थिक अपयश आले. क्षितिजावर उगवलेला नवा माडगूळकर केव्हाच मावळला. उरला रुपये आणि पैच्या चक्रात भोवंडून गेलेला 'रवीन्द्र भट' नावाचा तरुण!

पोटासाठी वणवण सुरू झाली. १९६८ मध्ये पुणे आकाशवाणीवर रुजू झालो. स्थिरावलो. आकाशवाणीसाठी शेकड्यानं गाणी लिहिली. 'मोगरा फुलला' सारखी गीतमालिका जनमानसाला आवडली. रसिकांनी डोक्यावर घेतली. या काळात अण्णा पंचवटीत होते. मी शिवाजीनगरच्या कार्यालयात! मधले रेल्वेरूळ कधी ओलांडलेच नाहीत. एक दिवस अण्णा कशालातरी ऑफिसात आले. मला पाहिलं. मुक्त हसले. लहान मुलासारखं जवळ घेतलं. शेजारी केंद्राधिकारी होते. त्यांना म्हणाले, 'पाहा आमचा पट्टशिष्य...? ज्ञानेश्वरांनासुद्धा शब्दात बांधून ठेवलं यांनी....!''

माझ्या डोळ्यांत त्यावेळी जी आसवं तरळली त्याला कुठलंही मोल नाही! माडगूळकर जे जीवन जगले, ते सर्वसामान्यांपेक्षा अतिशय वेगळं होतं. लहानपणचं अठराविश्वे दारिद्र्य आणि स्वकर्तृत्वावर पुढे मिळविलेलं वैभव या दोन्हींचा त्यांच्या जीवनावर पगडा होता. दुसऱ्याचं दुःख पाहून हेलावणारे माडगूळकर आणि व्यवसायात आपल्यापुढे कुणालाही जाऊ न देणारे माडगूळकर अशी दोन व्यक्तिमत्त्वं त्यांच्यामध्ये सतत वास करीत असावीत. त्यांच्या कुटुंबावर त्यांचं ओतप्रोत प्रेम होतं, तितकंच त्यांचं स्वतःवरही प्रेम होतं.

बारा वाजता दारी आलेल्या कुणालाही आपल्या पंगतीला आग्रहाने बसविणारे अण्णा, एखाद्या माणसाला त्याचा काहीही अपराध नसताना टोचून बोलतील, त्याला दुखावतील. त्याच्या मनाची मुळीसुद्धा पर्वा करणार नाहीत. त्यामुळे अण्णांविषयी जिव्हाळ्याने बोलणाऱ्या लोकांइतकेच त्यांच्याविषयी दुराव्यानं बोलणारे लोक अजूनही आहेत. मला अभिप्रेत आहे त्यांच्यामधील संस्कारक्षम